*हजारो अनुयायांनी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या मुख्य प्रशासिका दादी जानकीदेवी यांनी दिल्या शुभेच्छा*

*परमपूज्य दादीजींचे जीवन म्हणजे योगाचे मूर्तीमंत उदाहरण - सुधीर मुनगंटीवार*
=====================================================

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या मुख्य प्रशासिका दादी जानकीदेवी यांनी वयाची 103 वर्षे पूर्ण केल्याबद्दल वडाळा येथेआयोजित समारंभात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांची भेट घेत शुभेच्छा दिल्या , दादी जानकीदेवी यांनी सुधीर मुनगंटीवार यांना आशिर्वाद दिला. हजारो अनुयायांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.
3 महिन्यांपूर्वी माउंट आबु आयोजित140 देशामधील प्रतिनिधिंच्या सम्मेलनात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना अतिथी म्हणून आमंत्रित केले होते.
परमपूज्य दादीजींचे जीवन म्हणजे योगाचे मूर्तीमंत उदाहरण असल्याचे सांगत भारतीय संस्कृतीची बीजे त्यांनी विदेशात रोवण्याचे महान कार्य केले असून या वयातही त्यांची ऊर्जा , उत्साह वाखाणण्याजोगा आहे. दादी जानकीदेवी यांना ईश्वरीय कार्यासाठी निरामय दीर्घायुष्य लाभो अशा शुभेच्छा सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी त्यांना दिल्या .